दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ । अंक १२६। पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306
DIGITAL EDITION



तरुणांसाठी व्यायाम शाळा व क्रीडांगणाची मागणी!

(पान २ वर)

Selected

### युरिया-डीएपीसोबत ‘लिंकिंग’ केल्यास थेट गुन्हा

**मुंबई | प्रतिनिधी** | खरीप हंगामात शेतकऱ्यांना युरिया आणि डीएपी खतांचा पुरवठा सुरळीत व्हावा तसेच खत विक्रेत्यांकडून होणाऱ्या कथित पिळवणुकीला आळा बसावा, यासाठी महाराष्ट्र शासनाने कडक भूमिका घेतली आहे. युरिया किंवा डीएपी खताची विक्री करताना त्यासोबत इतर खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये किंवा कृषी औषधे घेण्याची सक्ती अर्थात ‘लिंकिंग’ केल्याचे आढळल्यास संबंधितांविरोधात गुन्हे दाखल करण्याचा इशारा शासनाने दिला आहे. काही ठिकाणी युरिया किंवा डीएपी घेण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यांना त्यासोबत इतर अनावश्यक उत्पादने खरेदी करण्याची सक्ती केली जात असल्याच्या तक्रारी समोर येतात. खतांची उपलब्धता कमी असल्याचे सांगून किंवा तुटवड्याचा गैरफायदा घेत अशा पद्धतीने अतिरिक्त खरेदी करण्यास भाग पाडल्यास शेतकऱ्यांवर अनावश्यक आर्थिक भार पडतो.

## ५९१ कोटींच्या कामांचे कागदोपत्री आदेश, तिघांना अटक

# कुंभमेळ्याच्या नावाने बनावट वर्क ऑर्डरचा पर्दाफाश!

## विभागीय आयुक्तांच्या बनावट सह्यांनी ५९१ कोटींच्या कामांच्या वर्क ऑर्डर; तिघांविरोधात गुन्हा

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव/नाशिक | प्रतिनिधी : नाशिक येथे आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कामांच्या नावाने बनावट वर्क ऑर्डर तयार करून शासनाची फसवणूक करण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांच्या दोन नातेवाईकांसह तिघांना पोलिसांनी अटक केली आहे.**

विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या बनावट स्वाक्षरीचा वापर करून तब्बल ५९१ कोटी रुपयांच्या कामांच्या वर्क ऑर्डर तयार करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणी नाशिक रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांच्या तपासात आतापर्यंत पाच बनावट वर्क ऑर्डर समोर आल्याची माहिती देण्यात आली आहे. कागदोपत्री या कामांची किंमत ५९१ कोटी रुपये दाखविण्यात आल्याचे समोर आले आहे. मात्र, प्रत्यक्षात या बनावट कागदपत्रांच्या माध्यमातून तीन कोटी पाच लाख रुपयांची फसवणूक झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

**गिरीश महाजनांच्या दोन नातेवाईकांना अटक**

या प्रकरणात जळगाव जिल्ह्यातील



तनय अनंत महाजन आणि नरेंद्र महाजन यांच्यासह आणखी एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. हे आरोपी गिरीश महाजन यांच्या जामनेर विधानसभा मतदारसंघातील असल्याची माहिती समोर आली आहे. कुंभमेळ्याच्या कामांसाठी तयार करण्यात आलेल्या बनावट कागदपत्रांचा वापर करून संबंधितांकडून पैसे उकळण्याचा प्रयत्न झाल्याचा पोलिसांचा संशय आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असून आणखी काही व्यक्तींची नावे समोर येण्याची शक्यता आहे.

**विभागीय आयुक्तांच्या बनावट सहीचा वापर**

या प्रकरणातील सर्वाधिक गंभीर बाब म्हणजे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या नावाने बनावट स्वाक्षरी करून वर्क ऑर्डर तयार करण्यात आल्याचा आरोप आहे. कुंभमेळ्याच्या कामांसाठी शासनाची अधिकृत प्रक्रिया असल्याचा आभास निर्माण करून या बनावट आदेशांचा वापर करण्यात आल्याचे तपासातून समोर येत आहे. पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत पाच वर्क ऑर्डर ताब्यात घेतल्या असून, त्यांच्या सत्यतेची आणि त्या तयार करण्यामागील संपूर्ण नेटवर्कची चौकशी सुरू आहे.

**“नातेवाईक असला तरी गय नाही”**

या प्रकरणावर कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी कठोर प्रतिक्रिया दिली आहे. संबंधित आरोपी आपला दूरचा नातेवाईक असल्याचे मान्य करताना, “तो फार वाया गेलेला आहे. त्याच्यावर पूर्वीपासून काही गुन्हे दाखल आहेत. नातेवाईक असला तरी त्याची गय केली

### जळगावातील राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

दरम्यान, या प्रकरणात धरणगाव शहरातील भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्याशी संबंधित काही स्थानिक नेत्यांचा सहभाग असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. मात्र, या चर्चांना अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. पोलिसांच्या तपासातून या प्रकरणात आणखी कोणाची नावे समोर येतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

जाणार नाही,” अशी भूमिका महाजन यांनी मांडली. या प्रकरणात आणखी सात-आठ जणांचा सहभाग समोर येण्याची शक्यता असून, दोषी आढळणाऱ्या प्रत्येकावर कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. नाशिकच्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करण्यात आली असून, नियोजनावरून यापूर्वीच विरोधक आणि विविध घटकांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. त्यातच आता कुंभमेळ्याच्या नावाने बनावट वर्क ऑर्डर काढून फसवणुकीचा प्रकार समोर आल्याने प्रशासनासमोरही मोठे आव्हान निर्माण झाले आहे. बनावट वर्क ऑर्डर कोणी तयार केल्या, त्यामागील आर्थिक व्यवहार कोणाकडे पोहोचले आणि या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# ‘सेक्स सॉर्टेड’ गर्भाधानानंतरही आमदारांच्या गायीने दिला बछड्याला जन्म

**जन सम्राट टाईम्स**

**गाझियाबाद / लोणी | प्रतिनिधी**
लोणी विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार नंद किशोर गुर्जर यांच्या गायीने ‘सेक्स सॉर्टेड’ कृत्रिम गर्भाधानानंतर नर पिल्लाला जन्म दिल्याची घटना सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. मादी पिल्लू जन्माला यावे, या उद्देशाने गायीचे विशेष पद्धतीने कृत्रिम गर्भाधान करण्यात आले होते. मात्र, प्रसूतीनंतर अपेक्षेच्या उलट नर पिल्लाचा जन्म झाल्याने आमदारांसह पशुपालन विभागाचे अधिकारीही आश्चर्यचकित झाले.

**मादी पिल्लाच्या अपेक्षेने केले होते गर्भाधान**

आमदार नंद किशोर गुर्जर यांनी साहिवाल नस्लची गाय पाळली आहे. सुमारे नऊ महिन्यांपूर्वी गायीच्या गर्भाधानासाठी त्यांनी पशुपालन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला होता. त्यानंतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या ‘सेक्स सॉर्टेड’ कृत्रिम गर्भाधान पद्धतीचा वापर करण्यात आला.

या तंत्रज्ञानाचा उद्देश मादी वासरू जन्माला येण्याची शक्यता



वाढविणे हा आहे. त्यामुळे आमदारांच्या गायीपासून मादी पिल्लाचा जन्म होईल, अशी अपेक्षा होती.

**प्रसूतीनंतर निकालाने दिला धक्का**

बुधवारी गायीची प्रसूती झाली. मात्र, मादी पिल्लाऐवजी नर बछड्याचा जन्म झाल्याचे समोर आले. त्यामुळे ही बाब आमदार आणि पशुपालन विभागाच्या अधिकाऱ्यांसाठीही कुतूहलाचा विषय ठरली.

या प्रक्रियेत तांत्रिक त्रुटी झाली का किंवा अन्य काही कारणामुळे अपेक्षित परिणाम मिळाला नाही का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे.

**‘शंभर टक्के हमी नसते’**

मुख्य पशुचिकित्साधिकारी डॉ. एस. पी. पांडे यांच्या माहितीनुसार, सेक्स सॉर्टेड कृत्रिम गर्भाधानातून अपेक्षित लिंगाचे वासरू जन्माला येण्याची शक्यता साधारण ९५ टक्क्यांपर्यंत असू शकते. मात्र, उर्वरित काही टक्के प्रकरणांमध्ये अपेक्षित परिणाम न मिळण्याची शक्यता कायम असते.

त्यामुळे या घटनेला तांत्रिक प्रक्रियेतील दुर्मिळ अपवाद मानले जात आहे. या प्रकारामुळे पशुपालन क्षेत्रातही सेक्स सॉर्टेड कृत्रिम गर्भाधानाच्या परिणामकारकतेबाबत चर्चा रंगली आहे.

**पशुपालकांमध्येही उत्सुकता**

मादी वासरांच्या जन्माचे प्रमाण वाढविण्यासाठी सेक्स सॉर्टेड कृत्रिम गर्भाधानाचा वापर केला जातो. मात्र, या प्रक्रियेतही शंभर टक्के अपेक्षित परिणाम मिळेलच असे नाही, हे या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# “डॉ. आंबेडकरांनंतर मीच देशाचापहिलाबौद्धकायदामंत्री”

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली| प्रतिनिधी:** संसदेच्या राज्यसभेत ‘ट्रिब्यूनल्स रिफॉर्म्स बिल २०२६’ वर झालेल्या चर्चेदरम्यान केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी आपल्या बौद्ध धर्मीय ओळखीचा संदर्भ देत महत्त्वपूर्ण विधान केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर केंद्रीय कायदामंत्री पद भूषविणारे आपण पहिले बौद्ध व्यक्ती असल्याचे त्यांनी सांगितले. हे विधान यापूर्वीही रिजिजू यांनी सार्वजनिकरीत्या केले आहे. संजय सिंह यांच्या प्रश्नाला उत्तर ‘ट्रिब्यूनल्स रिफॉर्म्स बिल २०२६’वरील चर्चेदरम्यान आम आदमी पक्षाचे खासदार संजय सिंह यांनी न्यायव्यवस्था आणि न्यायाधिकरणांमधील प्रतिनिधित्वासंदर्भात प्रश्न उपस्थित केला. त्याला उत्तर देताना रिजिजू यांनी आपल्या पार्श्वभूमीचा उल्लेख केला. या चर्चेदरम्यान त्यांनी न्यायाधीशांच्या नियुक्त्यांसाठीच्या कॉलेजियम व्यवस्थेबाबतही आपली भूमिका मांडली. ट्रिब्यूनल्स रिफॉर्म्स बिल राज्यसभेत मंजूर दरम्यान, ट्रिब्यूनल्स रिफॉर्म्स बिल, २०२६ राज्यसभेत ११ ऑगस्ट रोजी मंजूर झाले, त्याआधी १० ऑगस्टला लोकसभेने हे विधेयक मंजूर केले होते.

### जळगाव शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचा एल्गार

**जळगाव | प्रतिनिधी**

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगाव येथील कंत्राटी कर्मचाऱ्यांचा गेल्या चार महिन्यांपासून पगार थकीत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. थकीत वेतन तातडीने अदा करावे, या मागणीसाठी कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात धाव घेत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. चार महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याने कंत्राटी कर्मचाऱ्यांसमोर आर्थिक अडचणींचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. घरखर्च, मुलांचे शिक्षण, कर्जाचे हप्ते तसेच वैद्यकीय खर्च भागवताना कर्मचाऱ्यांची मोठी आर्थिक कोंडी होत असल्याचे त्यांनी निवेदनातून स्पष्ट केले.

# कर्नाटकात गुटखा-पान मसाल्यावर वर्षभराची बंदी; उत्पादनापासून विक्रीपर्यंत सर्व व्यवहारांवर निर्बंध

**जन सम्राट टाईम्स**

**बेंगळुरू | प्रतिनिधी**

तंबाखू आणि निकोटिनच्या सेवनामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम लक्षात घेऊन कर्नाटक सरकारने गुटखा, पान मसाला आणि तंबाखू-निकोटिनयुक्त संबंधित उत्पादनांवर एक वर्षासाठी बंदी घातली आहे. या निर्णयामुळे अशा उत्पादनांचे उत्पादन, साठवणूक, वितरण, वाहतूक आणि विक्रीवर राज्यभर निर्बंध लागू झाले आहेत. कर्नाटक अन्न सुरक्षा आणि औषध प्रशासन विभागाच्या अधिसूचनेनुसार, तंबाखू अथवा निकोटिन असलेले गुटखा, पान मसाला तसेच तत्सम खाद्यपदार्थ यांच्यावर ही कारवाई करण्यात आली



आहे. नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**उत्पादन, साठवणूक आणि विक्रीवर बंदी**

बंदीच्या कालावधीत संबंधित उत्पादनांचे उत्पादन, साठवणूक, वितरण, वाहतूक आणि विक्री करता येणार नाही. त्यामुळे दुकानदार, वितरक आणि उत्पादकांनाही या निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी लागणार आहे. ही कारवाई खाद्य सुरक्षा आणि मानक अधिनियम, २००६ मधील कलम ३०(२)(अ) तसेच संबंधित नियमांच्या आधारे करण्यात आल्याचे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

**राज्यभर विशेष तपासणी मोहीम**

बंदीच्या निर्णयानंतर प्रशासनाकडून राज्यभरात विशेष तपासणी आणि अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येणार आहे. प्रतिबंधित उत्पादनांची विक्री, साठवणूक किंवा वाहतूक करताना आढळणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# आप्पावाडीत 11 फुटी भव्य ध्यानस्थ महादेव मूर्तीचा आज अनावरण सोहळा

## श्रीराम मंदिर द्वारकाधीश आश्रमात श्रावणानिमित्त धार्मिक कार्यक्रम

**जन सम्राट टाईम्स**

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी**

आप्पावाडी येथील श्रीराम मंदिर द्वारकाधीश आश्रमात श्रावण महिन्याच्या पावन पर्वानिमित्त ११ फुटी भव्य ध्यानस्थ महादेव मूर्तीचा अनावरण व दर्शन सोहळा गुरुवार, १३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ४ वाजता भक्तिमय वातावरणात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यामुळे आप्पावाडी परिसरात धार्मिक आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे.

हा भव्य धार्मिक सोहळा श्री श्री १००८ महामंडलेश्वर डॉ. स्वामी विशालानंद सरस्वती महाराज यांच्या पावन मार्गदर्शनाखाली तसेच श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी रामानंद सरस्वती महाराज यांच्या व्यवस्थापनाखाली पार पडणार आहे.

**सकाळी भव्य शोभायात्रा**

मूर्ती अनावरण सोहळ्याच्या निमित्ताने सकाळी १० वाजता आप्पावाडी येथून श्रीराम मंदिर द्वारकाधीश आश्रमापर्यंत



११ फुटी ध्यानस्थ महादेव मूर्तीची भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. डीजे आणि मंगलवाद्यांच्या गजरात निघणाऱ्या या शोभायात्रेत परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

शोभायात्रेचे विशेष आकर्षण म्हणून ज्युनिअर चार्ली फाउंडेशनचे कलाकार सोमनाथ आप्पा स्वभावणे यांच्या विशेष कलाविष्काराचे सादरीकरण होणार आहे.

**मान्यवरांची उपस्थिती**

या धार्मिक सोहळ्यास खासदार संदिपान भुमरे, महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट, मंत्री अतुल सावे, तसेच भागवत कराड, चंद्रकांत खैरे आणि समीर राजूरकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजप कामगार मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष चेतन तायडे राहणार आहेत. तसेच विश्व हिंदू परिषदेचे महाराष्ट्र व गोवा क्षेत्र नैतिक मूल्य शिक्षण योजना प्रमुख संजयआप्पा बारगजे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. विविध सामाजिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवरही सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत.

**महाप्रसादाचे आयोजन**

मूर्तीच्या अनावरण व दर्शन सोहळ्यानंतर भाविकांसाठी सायंकाळी ५ वाजल्यापासून भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. शहर व परिसरातील भाविकांनी कुटुंबासह उपस्थित राहून भगवान महादेवाचे दर्शन घ्यावे आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# शिंदेंची मुख्यमंत्रिपदावर झालेली निवड पूर्णपणे बेकायदेशीर!

## ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांचा जोरदार युक्तिवाद सुरूच

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली | प्रतिनिधी**

शिवसेना पक्षातील ऐतिहासिक फूट, पक्षाचे मूळ नाव आणि 'धनुष्यबाण' हे निवडणूक चिन्ह नक्की कुणाचे, या अत्यंत कळीच्या मुद्द्यांवरून सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीने आता अत्यंत निर्णायक आणि महत्त्वपूर्ण वळण घेतले आहे. बुधवारी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी कालही जोरदार युक्तिवाद केला. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती बागची यांच्या खंडपीठासमोर झालेल्या या सुनावणीत सिब्बल यांनी एकनाथ शिंदे गटाची कायदेशीर वैधता, निवडणूक आयोगाची सदोष प्रक्रिया आणि लोकशाहीतील पक्षांतराचे धोके यांवर सविस्तर आणि अत्यंत आक्रमक मांडणी केली. शिंदेंची मुख्यमंत्रिपदावर झालेली निवड ही पूर्णपणे बेकायदेशीर असल्याची सिब्बल यांनी ठासून मांडणी केली. सुनावणीदरम्यान कपिल सिब्बल यांनी थेट एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रिपदावरील निवडीवरच अत्यंत गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शिंदेंची मुख्यमंत्रिपदावर झालेली निवड ही पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचा दावा करत त्यांनी न्यायालयास निदर्शनास आणून दिले की, केवळ काही बंडखोर आमदारांच्या संख्याबळाच्या (बहुमताच्या) आधारावर त्यांना राज्याचे मुख्यमंत्रिपद बहाल करण्यात आले. या प्रक्रियेत शिवसेनेच्या मूळ संघटनात्मक स्थितीची कोणतीही शहानिशा करण्यात आली नाही. विधिमंडळातील गट म्हणजेच संपूर्ण पक्ष नव्हे आणि निवडणूक आयोगाने उपलब्ध कागदपत्रांचा योग्य विचार न करता स्वतःच्या सोयीने निष्कर्ष काढला, हा कळीचा मुद्दा सिब्बल यांनी अत्यंत प्रभावीपणे मांडला.

**लोकशाही मूल्यांची न्यायालयाला करून दिली आठवण**

विधीमंडळ पक्ष आणि मूळ राजकीय पक्ष यांच्यातील फरकावर बोट ठेवत सिब्बल यांनी लोकशाहीच्या मूल्यांची न्यायालयाला आठवण करून दिली. "एखाद्या राजकीय पक्षाच्या केवळ विधिमंडळ शाखेला पक्षात फूट पाडण्याची आणि त्या आधारावर स्थापित सरकार पाडण्याची परवानगी देणे, हे लोकशाहीची थट्टा करण्यासारखे आहे. एका सत्ताधारी पक्षाला दुसरा विधिमंडळ पक्ष असा कसा विकत घेता येऊ शकतो?" असा खडा सवाल त्यांनी उपस्थित केला. यावर न्यायमूर्ती बागची यांनी निरीक्षण नोंदवले की, पक्षात पडलेली फूट ही सुरुवातीला विधिमंडळातून सुरू होऊ शकते आणि नंतर ती झिरपून तळागाळातील मूळ संघटनेत आणि प्राथमिक सदस्यांपर्यंत पोहोचू शकते; मात्र, पक्षात नेमकी फूट कशी आणि कुठे पडली, याचे सर्वप्रथम सखोल परीक्षण करणे गरजेचे आहे.

**शिवसेना म्हणजे नेमके काय?**

याच युक्तिवादाच्या ओघात सर्वोच्च न्यायालयाने थेट विचारणा केली की, "शिवसेना म्हणजे नेमके काय? पक्षाची मूळ रचना कशी आहे?" यावर उत्तर देताना सिब्बल यांनी स्पष्ट केले की, शिवसेना हा एक नोंदणीकृत राजकीय पक्ष असून, त्याची विविध स्तरांवर काम करणारी स्वतंत्र आणि व्यापक संघटनात्मक रचना आहे, ज्यात वेगवेगळ्या कामांसाठी अनेक उप-निकाय आहेत. केवळ विधीमंडळातील काही सदस्य म्हणजे संपूर्ण पक्ष होऊ शकत नाही. यावर सर्वोच्च न्यायालयानेही सहमती दर्शवत, केवळ कागदोपत्री दाव्यांवर अवलंबून न राहता प्रकरणातील 'जमिनीवरची सत्यता' (ग्राऊंड रिॲलिटी) आणि पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वातील फुटीची पाळेमुळे तपासण्याची ठाम भूमिका मांडली. ठाकरे गटाचा सर्वात मोठा आणि आक्रमक हल्ला केंद्रीय निवडणूक आयोगावर होता. आयोगाने आधीच एकनाथ शिंदे यांच्या बाजूने निकाल देण्याचे निश्चित केले होते आणि केवळ त्या विशिष्ट निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी आपल्या तर्कामध्ये सोयीस्कर फेरफार केल्याचा थेट आरोप सिब्बल यांनी केला.



### ठळक वैशिष्ट्ये

* शिंदेंची निवड बेकायदेशीर: केवळ आमदारांच्या संख्याबळावर संघटनेचा विचार न करता एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करणे घटनाबाह्य व बेकायदेशीर असल्याचा कपिल सिब्बलांचा सर्वोच्च न्यायालयात दावा.
* लोकशाहीची थट्टा: केवळ विधिमंडळ गटाला मूळ पक्ष फोडून सरकार पाडण्याची मुभा दिल्यास तो लोकशाहीचा खेळखंडोबा ठरेल, असा युक्तिवाद ठाकरे गटाकडून करण्यात आला.
* निवडणूक आयोगावर ताशेरे: निवडणूक आयोगाने शिंदे गटाच्या बाजूने निकाल देण्याचे आधीच ठरवले होते व त्यासाठी त्यांनी स्वतःच्या तर्कात फेरफार केल्याचा सिब्बलांचा अत्यंत गंभीर आरोप.
* २०१८ च्या घटनेचा सबळ पुरावा: शिवसेनेच्या २०१८ मधील घटनादुरुस्तीचे सर्व बदल निवडणूक आयोगाला रीतसर कळवले होते आणि त्याची अधिकृत पोचपावती आपल्याकडे असल्याचा ठाकरे गटाचा दावा.
* न्यायालयाचे निरीक्षण: आमदारांच्या फुटीवर अवलंबून न राहता, विधिमंडळातील फूट आणि पक्षाच्या मूळ संघटनेतील फूट यातील संबंधांची जमिनीवरची सत्यता (ग्राऊंड रिॲलिटी) तपासणे आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाचे मत.
* न्यायालयातील हास्यविनोद: युक्तिवादादरम्यान एका जुन्या संदर्भावरून सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी विचारलेल्या "बाप जिंकला की लेक?" या प्रश्नावर सिब्बलांनी दिलेल्या उत्तराने न्यायालयात हास्यविनोद रंगला.

# राजकारण नको, नागरिकांना शुद्ध पाणी हवे; पियुष चौधरी यांचे विरोधकांना प्रत्युत्तर !

## पाणीप्रश्नी आरोपांपेक्षा अधिकृत तपासणीला प्राधान्य द्या; दोष आढळल्यास संबंधितांवर कारवाईचा इशारा

जन सम्राट टाईम्स

**चोपडा। प्रतिनिधी**

चोपडा शहरातील पाणीपुरवठ्याच्या गुणवत्तेबाबत विरोधकांकडून करण्यात आलेल्या आरोपांना चोपडा नगरपरिषदेचे गटनेता तथा नगरसेवक पियुष राजेंद्र चौधरी यांनी प्रत्युत्तर दिले आहे. "पाणी हा नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. त्यात राजकारण न करता नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पाणी मिळणे याला प्राधान्य दिले पाहिजे," अशी भूमिका त्यांनी मांडली. पावसाळ्यात जलस्रोतांमध्ये गाळ आणि मातीचे प्रमाण वाढत असल्याने काही वेळा पाण्याच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांना सुरक्षित व शुद्ध पाणी मिळावे, यासाठी नगरपरिषद प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना सातत्याने करण्यात येत असल्याचे चौधरी यांनी स्पष्ट केले.



**अधिकृत नमुने तपासण्याची मागणी**

विरोधकांनी फिल्टर प्लांटची पाहणी केल्याचे स्वागत करताना चौधरी म्हणाले की, "केवळ पाहणी करून राजकीय आरोप करण्यापेक्षा पाण्याचे अधिकृत नमुने प्रयोगशाळेत तपासून त्याचा अहवाल जनतेसमोर मांडणे अधिक महत्त्वाचे आहे. प्रयोगशाळेच्या अहवालाशिवाय पाणी दूषित असल्याचे सांगून नागरिकांमध्ये भीती निर्माण करणे योग्य नाही."

शहरातील पाणीपुरवठ्याबाबत नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींची तातडीने दखल घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. आवश्यक त्या ठिकाणी पाण्याचे नमुने तपासणे, फिल्टर प्लांटमधील शुद्धीकरण प्रक्रिया तपासणे, जलसाठ्यांची स्वच्छता करणे तसेच पाणी शुद्धीकरणाची प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यावर नगरपरिषदेचा भर राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**दोष आढळल्यास कारवाईचा इशारा**

"आम्ही सत्ताधारी आहोत. त्यामुळे नागरिकांप्रती आमची जबाबदारी आहे. व्यवस्थेत काही कमतरता आढळल्यास ती मान्य करून दूर करण्याची जबाबदारीही आमचीच आहे. मात्र, तपासणीपूर्वी निष्कर्ष काढणे योग्य नाही," असे चौधरी यांनी नमूद केले.

तपासणीदरम्यान कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याचा निष्काळजीपणा अथवा कर्तव्यात कसूर आढळून आल्यास नियमानुसार कारवाई करण्यासाठी सत्ताधारी गट प्रशासनाकडे ठामपणे पाठपुरावा करेल, असेही त्यांनी सांगितले.

**'पाणी हा राजकारणाचा विषय नाही'**

"चोपडा शहरातील नागरिकांना स्वच्छ आणि सुरक्षित पाणी मिळणे हा आमच्यासाठी राजकारणाचा विषय नसून जबाबदारीचा विषय आहे. विरोधकांनी आरोप करण्यापेक्षा वस्तुस्थिती तपासण्यासाठी सहकार्य करावे. आम्ही मात्र समस्येवर उपाय करून दाखवू," असा विश्वास गटनेता पियुष चौधरी यांनी व्यक्त केला.

दरम्यान, पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू असताना पाण्याची प्रत्यक्ष गुणवत्ता, प्रयोगशाळा अहवाल आणि नगरपरिषद प्रशासनाच्या उपाययोजना याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## ह.भ.प. सुनील महाराज शास्त्री यांना मानाचा 'सावित्री शक्ती पुरस्कार'!


जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी:** समस्त माळी पंचचे अध्यक्ष ह.भ.प. सुनील महाराज शास्त्री यांना सावित्रीबाई फुले शक्तीपीठ, पुणे यांच्या वतीने प्रतिष्ठित 'सावित्री शक्ती पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्यांच्या सामाजिक, धार्मिक आणि अध्यात्मिक कार्याची दखल घेत मिळालेल्या या सन्मानामुळे माळी समाजात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. समाजप्रबोधनातील योगदानाची दखल ह.भ.प. सुनील महाराज शास्त्री हे समाजप्रबोधन, सामाजिक एकोपा, संस्कार आणि अध्यात्माच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक दिशा देण्यासाठी सातत्याने कार्यरत आहेत. समाजबांधवांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्यासोबतच संस्कार आणि अध्यात्माची ज्योत तेवत ठेवण्याच्या त्यांच्या कार्याची या पुरस्काराद्वारे दखल घेण्यात आली आहे. निस्वार्थ समाजसेवेची भावना, समाजाच्या प्रश्नांविषयी असलेली तळमळ आणि सकारात्मक विचारसरणी यामुळे ते समाजबांधवांसाठी प्रेरणास्थान ठरत असल्याचे यावेळी गौरवोद्गार काढण्यात आले. समाजबांधवांकडून अभिनंदन 'सावित्री शक्ती पुरस्कार' मिळाल्याबद्दल समस्त माळी पंच तसेच समाजबांधवांच्या वतीने ह.भ.प. सुनील महाराज शास्त्री यांचे अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या हातून सामाजिक, धार्मिक आणि अध्यात्मिक क्षेत्रातील कार्य यापुढेही अविरत सुरू राहावे, तसेच त्यांना उत्तम आरोग्य, यश आणि दीर्घायुष्य लाभावे, अशा शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. "ह.भ.प. सुनील महाराज शास्त्री यांना 'सावित्री शक्ती पुरस्कार' मिळाल्याबद्दल सर्व समाजबांधवांकडून हार्दिक अभिनंदन व पुढील सामाजिक, धार्मिक आणि आध्यात्मिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!" जय संत सावता महाराज! जय महात्मा ज्योतिराव फुले! जय क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले! रामकृष्ण हरी, पांडुरंग हरी!

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## तरुणांसाठी व्यायामशाळा व क्रीडांगणाची मागणी!

### ग्रामसभेत ठराव घेण्याची मागणी



जन सम्राट टाईम्स

**धरणगाव । प्रतिनिधी:** धरणगाव तालुक्यातील जांभोरे येथे तरुणांसाठी सुसज्ज व्यायामशाळा आणि क्रीडांगण उपलब्ध करून द्यावे, या मागणीसाठी गावातील तरुणांनी ग्रामसेवकांना निवेदन सादर केले आहे. आगामी १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या स्वातंत्र्यदिनाच्या विशेष ग्रामसभेत या मागणीवर चर्चा करून सर्वानुमते ठराव मंजूर करावा, अशी आग्रही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. क्रीडा सुविधांच्या अभावामुळे तरुणांची गैरसोय गावात पुरेशा क्रीडा सुविधा उपलब्ध नसल्याने तरुणांना मैदानी खेळ खेळण्यासाठी तसेच नियमित व्यायाम करण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. तरुणांचे आरोग्य आणि क्रीडा कौशल्याला चालना मिळावी, यासाठी गावात सुसज्ज व्यायामशाळा आणि क्रीडांगण उभारणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ही मागणी प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी गावातील तरुण एकत्र आले. तरुणांचे सूचक रुपेश भिल यांनी पुढाकार घेत ग्रामसेवकांना निवेदन सुपूर्द केले. १५ ऑगस्टच्या ग्रामसभेकडे लक्ष स्वातंत्र्यदिनानिमित्त होणाऱ्या ग्रामसभेत या विषयावर सविस्तर चर्चा करून ठराव मंजूर करावा आणि त्यानंतर आवश्यक प्रशासकीय कार्यवाही सुरू करावी, अशी मागणी तरुणांनी केली आहे. ग्रामसभेत सकारात्मक निर्णय होऊन गावात लवकरच क्रीडांगण व व्यायामशाळा साकारेल, अशी आशा तरुणांनी व्यक्त केली. यावेळी संजय बिऱ्हाडे, अर्जुन मोहिते, विशाल बोरसे, कल्पेश पवार, ज्ञानेश्वर पवार, गोपाल पवार, हर्षल कोळी, नयनेश पवार, सुरज बेलदार, महेश हटकर, दिगंबर मालचे, नरेश बोरसे, उमेश चव्हाण, नवल कोळी, तुषार बोरसे, शाहरुख शेख, रोहित बोरसे, अजय कोळी, विजय कोळी, बादल चव्हाण, गौरव पाटील, गणेश निकम, राजेश हटकर, विशाल हटकर, अरुण सोनवणे, लवा सोनवणे, सुदर्शन पवार, अमोल अहिरे, हर्षल बिसेन, उदय पुरभे, दिवेश चव्हाण, सौरव सपकाळे, स्वप्नील निकम, रोशन मोरे, अभय परदेशी, सागर कोळी, मुकेश पवार, कल्पेश सोनवणे, प्रीतम गुजर, अर्जुन बेलदार, प्रदीप मोरे यांच्यासह गावातील अनेक तरुण उपस्थित होते.

## लासुर येथे महाकाल ग्रुपतर्फे भव्य रक्तदान शिबिर; ८१ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

### संत शिरोमणी सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त सामाजिक उपक्रम

जन सम्राट टाईम्स



**चोपडा | प्रतिनिधी:** लासुर येथे क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त तसेच संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाकाल ग्रुप, लासुर यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. माळी समाज मंगल कार्यालय, लासुर येथे सकाळी ८ वाजता हे शिबिर पार पडले. या रक्तदान शिबिरास क्षत्रिय माळी समाज सुधारणा मंडळ महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश तसेच क्षत्रिय माळी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष ए. के. गंभीर सर, उपाध्यक्ष नरेंद्र महाजन, सचिव किशोर माळी, सहसचिव नंदलाल माळी, लोकल ऑडिटर प्रकाश माळी यांच्यासह क्षत्रिय माळी समाज विकास मंडळाचे सर्व संचालक तसेच विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते. ८१ रक्तदात्यांनी केले रक्तदान या शिबिरात लासुर व चौगाव येथील ८१ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. रक्तदानाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मदत करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. शिबिरात सहभागी रक्तदात्यांसाठी चहा व बिस्कीटची व्यवस्था करण्यासाठी क्षत्रिय माळी समाज विकास मंडळाचे सचिव किशोर माळी सर व संचालक संजय महाजन यांनी सहकार्य केले. आयोजनासाठी महाकाल ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांचे परिश्रम शिबिराच्या यशस्वीतेसाठी महाकाल ग्रुपचे अध्यक्ष पवन महाजन, उपाध्यक्ष साहेबराव मगरे, सचिव अमोल गंभीर, खजिनदार निलेश राजकुळे, सदस्य जितेंद्र महाजन, भूमेश्वर मगरे, प्रेमराज शेलकर, महेंद्र माळी, आर. डी. महाजन, महेश महाजन, विनोद मगरे, नितीन माळी, योगेश माळी, समाधान माळी, मनोज महाजन आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार क्षत्रिय माळी समाज विकास मंडळाचे माजी सहसचिव अरुण महाजन यांनी मानले.लासुर येथे क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त तसेच संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाकाल ग्रुप, लासुर यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. माळी समाज मंगल कार्यालय, लासुर येथे सकाळी ८ वाजता हे शिबिर पार पडले. क्षत्रिय माळी समाज सुधारणा मंडळ महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश तसेच क्षत्रिय माळी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष ए. के. गंभीर सर, उपाध्यक्ष नरेंद्र महाजन, सचिव किशोर माळी, सहसचिव नंदलाल माळी, लोकल ऑडिटर प्रकाश माळी यांच्यासह क्षत्रिय माळी समाज विकास मंडळाचे सर्व संचालक तसेच विविध संस्थांचे उपस्थित होते. ८१ रक्तदात्यांनी केले रक्तदान या शिबिरात लासुर व चौगाव येथील ८१ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

## जळगाव जिल्ह्यातील नगरपरिषद, नगरपंचायतींच्या कामकाजाचा आढावा!

### पीएम आवास व अमृत २.० योजनांच्या अंमलबजावणीवर भर

जन सम्राट टाईम्स



**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या विविध विकासकामांचा व योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात १२ ऑगस्ट रोजी मुख्याधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत नागरी सुविधा, महसूल वसुली, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन तसेच विविध शासकीय योजनांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. 'माझी वसुंधरा' अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर बैठकीत 'माझी वसुंधरा अभियान ४.०' अंतर्गत पर्यावरण संवर्धनासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रात 'नमो उद्यान' विकसित करण्याच्या नियोजनावरही चर्चा करण्यात आली. पीएम आवास व अमृत २.० योजनांचा आढावा प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) १.० व २.० अंतर्गत सुरू असलेल्या घरकुल कामांची सद्यस्थिती तपासण्यात आली. त्याचबरोबर अमृत २.० योजना, पाणीपुरवठा व्यवस्था आणि राज्य नगरोत्थान योजनेअंतर्गत सुरू असलेल्या पायाभूत सुविधांच्या कामांना गती देण्याचे निर्देश देण्यात आले. दिव्यांगांसाठी राखीव निधीचा योग्य वापर करण्याच्या सूचना नगरपरिषद व नगरपंचायतींनी दिव्यांग कल्याणासाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीची योग्य तरतूद करून त्याचा प्रभावी वापर करावा, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या. यासोबतच जिल्हा नियोजन समितीअंतर्गत कामे, सौरऊर्जा प्रकल्प आणि ICT आधारित स्कॅनिंगच्या प्रगतीचाही आढावा घेण्यात आला.

न्यायालयीन प्रकरणे वेळेत निकाली काढण्याचे निर्देश न्यायालयीन प्रकरणांमध्ये आवश्यक शपथपत्रे वेळेत दाखल करणे तसेच न्यायालयाच्या आदेशांची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या सूचना मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आल्या. विकासकामे गुणवत्तेसह वेळेत पूर्ण करण्यावर भर शहरांमधील नागरी सुविधा अधिक सक्षम करणे, सुरू असलेल्या विकासकामांना गती देणे आणि पर्यावरणपूरक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे यावर जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष भर दिला. सर्व मुख्याधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील कामे वेळेत, गुणवत्तेसह आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करावीत, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

## आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात एल्गार!

### छत्रपती संभाजीनगरात हजारोंचा जनसमुदाय रस्त्यावर

जन सम्राट टाईम्स

**सोयगाव | प्रतिनिधी:** छत्रपती संभाजीनगर शहरात अनुसूचित जातीच्या (SC) आरक्षणातील प्रस्तावित उपवर्गीकरणाविरोधात भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चात हजारो नागरिक सहभागी झाले असून, हातात निळे झेंडे घेत मोठा जनसमुदाय रस्त्यावर उतरला आहे. आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चातून अनुसूचित जातीच्या आरक्षणातील प्रस्तावित उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द करण्याची जोरदार मागणी करण्यात येत आहे. आरक्षणाच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आंदोलकांनी एकजूट दाखवत सरकारविरोधात घोषणाबाजी केली. मोठ्या संख्येने नागरिकांचा सहभाग मोर्चात विविध सामाजिक संघटना, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. निळे झेंडे आणि घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या हक्कांवर परिणाम होण्याची भीती आंदोलकांकडून व्यक्त करण्यात आली. पोलिसांचा चोख बंदोबस्त मोर्चाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त पोलीस तैनात करण्यात आले असून, मोर्चाच्या हालचालींवर प्रशासनाकडून लक्ष ठेवण्यात येत आहे.छत्रपती संभाजीनगर शहरात अनुसूचित जातीच्या (SC) आरक्षणातील प्रस्तावित उपवर्गीकरणाविरोधात भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चात हजारो नागरिक सहभागी झाले असून, हातात निळे झेंडे घेत मोठा जनसमुदाय रस्त्यावर उतरला आहे.

## कै. शामकांत गोयर यांच्या पुण्यस्मरणा निमित्त मुलींच्या बालगृहात अन्नदान!

### गरजू मुलींसाठी संवेदनशील उपक्रम




जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी:** मेहतर वाल्मिकी समाजाचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कै. शामकांत गोयर यांच्या सहाव्या पुण्यस्मरणानिमित्त गोयर परिवारातर्फे यमुनाबाई शैक्षणिक व सांस्कृतिक महिला मंडळ, धुळे संचलित श्री. संस्कार मतिमंद मुलींच्या बालगृहात अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून समाजसेवेचा वारसा जपत गरजू मुलींबद्दल संवेदनशीलता व्यक्त करण्यात आली. सामाजिक कार्याची प्रेरणादायी परंपरा कै. शामकांत गोयर यांनी सामाजिक कार्याच्या माध्यमातून समाजातील दुर्लक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेकांना धुळे महानगरपालिकेत रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांना पुरस्कार जाहीर केला होता. मात्र, पुरस्कार स्वीकारण्यापूर्वीच त्यांचे दुःखद निधन झाले. 'वडिलांचा समाजसेवेचा वसा कायम जपू' पुण्यस्मरणानिमित्त आयोजित या उपक्रमावेळी गोयर परिवारातील सदस्यांनी, "वडिलांनी सुरू केलेला समाजसेवेचा वसा आम्ही कायम जपत राहू," असा निर्धार व्यक्त केला. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करत सामाजिक बांधिलकी जपण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. या प्रसंगी मधुभाई श्याम गोयर, विजय शाम गोयर, विलास श्याम गोयर, विक्रम शाम गोयर, लोकेश गोयर, मुकेश गोयर, काशिनाथ लोहा, लखन चांगरे, जावडेकर दादा, चंदन घारू, विजय पवार, विजय नख्वाल, साजन सिस्वाल, सागर भाऊ परदेशी, अवि ग्रुप फागणे, शिवशक्ती ग्रुप, अमोल जाधव, दक्ष पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष बापू बागुल व त्यांचा ग्रुप, इच्छापूर्ती मारुती मित्र मंडळ, धुळे तसेच वाल्मिकी मेहतर समाजातील नागरिक आणि धुळ्यातील मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## लग्नातील 'ती' चूक महागात; अल्पवयीन पत्नी गर्भवती, 25 वर्षीय पतीला अटक

### कोल्हापुरात धक्कादायक प्रकार; अल्पवयीन मुलीशी विवाह करून शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स



**कोल्हापूर | प्रतिनिधी |** कोल्हापुरात अल्पवयीन मुलीशी विवाह केल्याचा आणि तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विवाहावेळी मुलीचे वय अवघे १६ वर्षे १६ दिवस असल्याचे पोलिस तपासात समोर आल्यानंतर राजारामपुरी पोलिसांनी २५ वर्षीय तरुणाला अटक केली आहे. या प्रकरणी POCSO कायद्यासह संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आकाश उर्फ टल्ली सुभाष पाटोळे (वय २५) याचा संबंधित अल्पवयीन मुलीसोबत विवाह झाला होता. विवाहाच्या वेळी मुलगी कायद्यानुसार अल्पवयीन असल्याचा आरोप आहे. त्यानंतर आरोपीने तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवल्याने ती गर्भवती राहिली.

**नातेवाईकांच्या तक्रारी**

मुलगी गर्भवती असल्याचे समोर आल्यानंतर तिच्या नातेवाईकांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत राजारामपुरी पोलिसांनी प्रकरणाची चौकशी सुरू केली. विवाहावेळी मुलीचे वय १६ वर्षे १६ दिवस असल्याची माहिती समोर आल्यानंतर पोलिसांनी आरोपीविरोधात POC-SO कायद्यानुसार कारवाई केली.

अल्पवयीन मुलीशी विवाह करणे तसेच तिच्याशी लैंगिक संबंध ठेवणे हा गंभीर कायदेशीर गुन्हा आहे. त्यामुळे विवाह झाला असला तरी संबंधित व्यक्तीचे वय कायदेशीरदृष्ट्या महत्त्वाचे ठरते. या प्रकरणात पोलिसांकडून विवाहाची पार्श्वभूमी, वयाचे पुरावे आणि इतर संबंधित बाबींचा तपास केला जात आहे.

**बालविवाहाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर**

या घटनेमुळे बालविवाह आणि अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. शिक्षण, आर्थिक परिस्थिती, सामाजिक दबाव आणि अन्य कारणांमुळे काही ठिकाणी अल्पवयीन मुलींचे विवाह होत असल्याचे प्रकार समोर येतात. मात्र, अशा विवाहांमुळे संबंधित मुलींच्या शिक्षणासह आरोग्य आणि सुरक्षिततेवरही गंभीर परिणाम होण्याची शक्यता असते.

दरम्यान, राजारामपुरी पोलिसांनी आरोपीला अटक केल्यानंतर या प्रकरणाचा पुढील तपास सुरू केला आहे. अल्पवयीन मुलीशी संबंधित प्रकरण असल्याने पोलिसांकडून सर्व बाबींची कायदेशीर प्रक्रिया आणि पुराव्यांच्या आधारे तपासणी केली जात आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स



# पुण्यात रंगणार राष्ट्रीय स्तरावरील 'विकसित भारत यूथ कॉन्क्लेव्ह-2026'; तीन दिवसीय महोत्सवाचे आयोजन

## १ हजार युवा प्रतिनिधींचा सहभाग; क्रीडा, नवोन्मेष, तंत्रज्ञान, उद्योजकता व संस्कृतीला मिळणार व्यासपीठ

जन सम्राट टाईम्स

**पुणे । प्रतिनिधी:** देशभरातील युवकांना क्रीडा, नवोन्मेष, तंत्रज्ञान, उद्योजकता आणि सांस्कृतिक क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुण्यातील बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे तीन दिवसीय राष्ट्रीय 'विकसित भारत यूथ कॉन्क्लेव्ह-२०२६' आयोजित करण्यात येणार आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाची घोषणा केली. देशभरातील युवकांना एकाच व्यासपीठावर आणून नेतृत्वगुण, नवोन्मेष आणि उद्योजकतेला चालना देण्याबरोबरच सांस्कृतिक विविधता आणि राष्ट्रीय एकात्मतेला बळकटी देणे हा या महोत्सवाचा उद्देश आहे. देशभरातून १ हजार युवा प्रतिनिधी महोत्सवात सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतून सुमारे १ हजार युवा प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील सुमारे ३००, तर अन्य राज्यांतील ७०० प्रतिनिधींचा समावेश असेल. 'वॉरियर', 'फ्युचर' आणि 'कल्चरल' अनुभव क्षेत्रे महोत्सवाची संकल्पना 'वॉरियर', 'फ्युचर' आणि 'कल्चरल' या तीन प्रमुख अनुभव क्षेत्रांवर आधारित असेल. युवकांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे, नव्या कल्पनांना वाव देणे, उद्योजकतेला प्रोत्साहन देणे, निरोगी जीवनशैलीचा प्रसार करणे आणि देशातील सांस्कृतिक वैविध्याचा परिचय करून देणे यावर विशेष भर राहणार आहे. डिजिटल नोंदणीची सुविधा महोत्सवात सहभागी होणाऱ्या प्रतिनिधींसाठी संपूर्ण प्रक्रिया सुलभ




करण्याच्या दृष्टीने पूर्णपणे डिजिटल नोंदणी प्रणाली विकसित करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत. "महाराष्ट्राला आगामी दशकात क्रीडा क्षेत्रात देशात आघाडीवर नेण्यासाठी शासकीय प्रयत्नांसोबतच खासगी क्षेत्राची (PPP Model) गुंतवणूक आणि कॉर्पोरेट क्रीडा फाउंडेशनशी समन्वय अत्यंत आवश्यक आहे."
क्रीडा क्षेत्रातील गुंतवणुकीवरही भर महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी शासनासोबत खासगी क्षेत्राचा सहभाग वाढविण्याची गरज असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधोरेखित केले.
PPP मॉडेल तसेच कॉर्पोरेट क्रीडा फाउंडेशनच्या माध्यमातून पायाभूत सुविधा आणि युवकांना उपलब्ध होणाऱ्या संधी वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती या आढावा बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे आयुक्त दीपक सिंगला यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.
देशभरातील युवकांना क्रीडा, नवोन्मेष, तंत्रज्ञान, उद्योजकता आणि सांस्कृतिक क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुण्यातील बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे तीन दिवसीय राष्ट्रीय 'विकसित भारत यूथ कॉन्क्लेव्ह-२०२६' आयोजित करण्यात येणार आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाची घोषणा केली. देशभरातील युवकांना एकाच व्यासपीठावर आणून नेतृत्वगुण, नवोन्मेष आणि उद्योजकतेला चालना देण्याबरोबरच सांस्कृतिक विविधता आणि राष्ट्रीय एकात्मतेला बळकटी देणे हा या महोत्सवाचा उद्देश आहे. देशभरातून १ हजार युवा प्रतिनिधी महोत्सवात सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतून सुमारे १ हजार युवा प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील सुमारे ३००, तर अन्य राज्यांतील ७०० प्रतिनिधींचा समावेश असेल. या तीन प्रमुख अनुभव क्षेत्रांवर आधारित असेल. युवकांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे, नव्या कल्पनांना वाव देणे, उद्योजकतेला प्रोत्साहन देणे, निरोगी जीवनशैलीचा प्रसार करणे आणि देशातील सांस्कृतिक वैविध्याचा परिचय करून देणे यावर विशेष भर राहणार आहे.

# 'टेबल टेनिस फेडरेशन ऑफ इंडिया'ची मान्यता निलंबित

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली| प्रतिनिधी :** केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने बुधवारी, दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी टेबल टेनिस फेडरेशन ऑफ इंडिया (TTFI)ची अधिकृत मान्यता निलंबित केली. महासंघातील प्रशासन आणि कारभारासंदर्भातील गंभीर त्रुटींच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. वेळेत निवडणुका न घेणे ठरले प्रमुख कारण क्रीडा मंत्रालयाच्या आदेशानुसार, TTFI निर्धारित कालमर्यादेत संघटनेच्या निवडणुका घेण्यात अपयशी ठरले. यापूर्वी मंत्रालयाने महासंघाला कारणे दाखवा नोटीस बजावली होती. मात्र, TTFIकडून देण्यात आलेले स्पष्टीकरण असमाधानकारक असल्याचे मंत्रालयाने नमूद केले.
महासंघाच्या कारभारात अपेक्षित सुशासन, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाच्या निकषांचे पालन होत नसल्याचे मंत्रालयाच्या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. OAकडे तात्पुरत्या व्यवस्थेची जबाबदारी TTFIची प्रशासकीय व्यवस्था सुरळीत होईपर्यंत देशातील टेबल टेनिसचा कारभार पाहण्यासाठी भारतीय ऑलिम्पिक संघटनेला (IOA) तदर्थ समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही प्रक्रिया आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस महासंघ (ITTF) यांच्या सल्लामसलतीने करण्याचेही निर्देश आहेत.
आशियाई क्रीडा स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर निर्णय महत्त्वाचा भारताच्या टेबल टेनिससाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरला असून, आशियाई क्रीडा स्पर्धेला अवघे काही आठवडे शिल्लक असताना महासंघाच्या प्रशासकीय व्यवस्थेत बदल करण्यात आला आहे. त्यामुळे भारतीय खेळाडूंच्या स्पर्धात्मक तयारीसह आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या व्यवस्थापनाकडेही लक्ष लागले आहे. क्रीडा क्षेत्रातील प्रशासनात पारदर्शकता आणि नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी मंत्रालयाने ही कारवाई केल्याचे मानले जात आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्यावरील प्रश्न सुटण्याची शक्यता!

## मंत्रिमंडळ बैठकीत अंतिम निर्णयाची शक्यता



जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** राज्यातील ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्यावर (लीज) असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांच्या लीज डीडचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी तसेच नवीन रेडी रेकनरऐवजी जुन्या दराने मुद्रांक शुल्क आकारण्याबाबत विधानभवनात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. विधानसभा पावसाळी अधिवेशनात मांडण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्र. २७६५ च्या अनुषंगाने विधानसभाध्यक्षांच्या दालनात ही बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, आमदार योगेश सागर, आमदार अतुल भातखळकर तसेच महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. १९८० पूर्वीच्या जमिनींसाठी जुन्या दराचा प्रस्ताव बैठकीत १९८० पूर्वीच्या ज्या जमिनींचे करार अथवा दर निश्चित झालेले नाहीत, त्यांच्यासाठी १९८० सालचा पहिला रेडी रेकनर दर लागू करण्याच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामुळे जुन्या भाडेपट्ट्यावरील सोसायट्यांना सध्याच्या वाढीव बाजारमूल्यानुसार मुद्रांक शुल्क भरण्याचा मोठा आर्थिक भार कमी होण्याची शक्यता आहे. निवासी आणि व्यावसायिक वापरासाठी स्वतंत्र दरांचा विचार बैठकीत निवासी आणि व्यावसायिक वापराच्या जमिनींसाठी स्वतंत्र दर निश्चित करण्याबाबतही विचारविनिमय करण्यात आला. यासंदर्भातील तांत्रिक, आर्थिक आणि कायदेशीर बाबींचा सविस्तर अभ्यास करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती आहे. मंत्रिमंडळाच्या आगामी बैठकीत अंतिम निर्णयाची शक्यता या प्रश्नाशी संबंधित सर्व तांत्रिक व कायदेशीर बाबी तपासल्यानंतर राज्य मंत्रिमंडळाच्या आगामी बैठकीत यावर चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आल्याचे सांगण्यात आले.वर्षांच्या भाडेपट्ट्यावरील गृहनिर्माण सोसायट्यांचे लीज डीड, पुनर्विकास आणि मालकी हक्काशी संबंधित प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. जुन्या रेडी रेकनर दरानुसार मुद्रांक शुल्क आकारण्याचा निर्णय झाल्यास अशा सोसायट्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

# जि.प. निवडणुकांचा मार्ग मोकळा; जळगावसह २० जिल्हा परिषदांसाठी डिसेंबरमध्ये रणधुमाळी?

## साडेचार वर्षांपासून रखडलेल्या निवडणुकांना मुहूर्त मिळण्याची शक्यता

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी:** गेल्या साडेचार वर्षांपासून रखडलेल्या जळगावसह राज्यातील २० जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचा मार्ग आता मोकळा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान राज्य शासनाने ५० टक्के आरक्षणाची मर्यादा कायम ठेवून तसेच 'एसआयआर' प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणुका घेण्याची तयारी दर्शविल्याने डिसेंबर २०२६ मध्ये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जळगावसह या २० जिल्हा परिषदांचा समावेश या निवडणूक प्रक्रियेत जळगावसह नंदुरबार, पालघर, गडचिरोली, नाशिक, धुळे, अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ, अकोला, नागपूर, ठाणे, गोंदिया, वाशिम, नांदेड, हिंगोली, वर्धा, भंडारा, लातूर आणि बुलढाणा या जिल्हा परिषदांचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे. २०१७ नंतर पहिल्यांदाच निवडणुकीची चाहूल जिल्हा परिषदांची शेवटची निवडणूक फेब्रुवारी २०१७ मध्ये झाली होती. निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाळ मार्च २०२२ मध्ये संपल्यानंतर विविध कारणांमुळे निवडणुका लांबणीवर पडल्या. आता सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी आणि राज्य शासनाच्या भूमिकेमुळे निवडणुकांबाबतचे चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे. जळगावमध्ये आरक्षणाचे गणित बदलणार? जळगाव जिल्हा परिषदेत सध्या ६८ पैकी ३७ जागा राखीव असल्याचे सांगितले जात आहे. हे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा अधिक असल्याने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्धारित मर्यादेनुसार आरक्षणाची फेररचना करावी लागू शकते. संभाव्य फेररचनेनुसार ३४ जागा राखीव आणि ३४ जागा सर्वसाधारण असे गणित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पंचायत समित्यांच्या गणांमध्येही ५० टक्के आरक्षणाची मर्यादा लागू करताना प्रशासनासमोर काही तांत्रिक व प्रशासकीय आव्हाने निर्माण होण्याची शक्यता आहे. इच्छुकांच्या भेटीगाठींना वेग निवडणुकांचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता निर्माण होताच गेल्या काही वर्षांपासून तयारी करणाऱ्या इच्छुकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणांमध्ये मतदारांच्या भेटीगाठी, जनसंपर्क आणि राजकीय हालचालींना वेग आला आहे. निवडणुकीला तीन-चार महिन्यांचा कालावधी राहण्याची शक्यता असल्याने जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण राजकारण तापण्यास सुरुवात झाली आहे. ग्रामपंचायत, जिल्हा बँकेनंतर आता जि.प. निवडणुकीची भर जळगाव जिल्ह्यात आगामी काळात ८२५ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची तयारी सुरू आहे. त्याचबरोबर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचीही चर्चा आहे. त्यात आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांची भर पडण्याची शक्यता असल्याने आगामी काही महिने जिल्ह्याच्या ग्रामीण राजकारणासाठी निर्णायक ठरणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम एकाच वेळी वाजू लागल्यास प्रमुख राजकीय पक्षांसह इच्छुक उमेदवारांनाही निवडणूक रणनीती नव्याने आखावी लागणार आहे.

# श्री व्ही. एस. नाईक महाविद्यालयात "वाचनसंस्कृती आणि आजचा तरुण" विषयावर व्याख्यान!

## पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन जयंतीनिमित्त आयोजन

जन सम्राट टाईम्स

**रावेर । (प्रतिनिधी):** येथील श्री व्ही. एस. नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त आय.क्यू.ए.सी. (IQAC) आणि ग्रंथालय विभागाच्या संयुक्त विद्यमाने "वाचनसंस्कृती आणि आजचा तरुण" या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात भूगोल विभागप्रमुख प्रा. चतुर गाढे यांनी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जी. पाटील होते. 'माहिती'पेक्षा 'ज्ञान' महत्त्वाचे : प्रा. चतुर गाढे मार्गदर्शन करताना प्रा. चतुर गाढे यांनी सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल, सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे पारंपरिक वाचनसंस्कृतीसमोर आव्हाने निर्माण झाली असली, तरी व्यक्तिमत्त्व विकास, ज्ञानवृद्धी आणि चिकित्सक विचारक्षमता



वाढविण्यासाठी वाचनाचे महत्त्व कायम आहे. मोबाईलच्या एका क्लिकवर मोठ्या प्रमाणात माहिती उपलब्ध होते; मात्र माहिती आणि ज्ञान यामध्ये फरक आहे. सखोल व तर्कशुद्ध विचार करण्यासाठी पुस्तकांचे सातत्यपूर्ण वाचन आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पुस्तके, वर्तमानपत्रे, चरित्रे आणि संदर्भग्रंथ यांच्या वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात तसेच भाषिक कौशल्य विकसित होते. त्याचबरोबर ई-बुक्स, डिजिटल ग्रंथालये आणि ऑडिओबुक्स यांसारख्या आधुनिक माध्यमांचा तरुणांनी विवेकपूर्ण वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. मोबाईलच्या पडद्यासोबत पुस्तकांच्या पानांनाही वेळ द्या : प्राचार्य डॉ. ए. जी. पाटील अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. ए. जी. पाटील यांनी सांगितले की, आजचा तरुण तंत्रज्ञानाचा कुशल वापरकर्ता आहे. मात्र, तंत्रज्ञानासोबत पुस्तकांशी मैत्री केली तर व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होईल. "मोबाईलच्या पडद्यासोबत पुस्तकांच्या पानांनाही वेळ देणे ही काळाची गरज आहे. वाचनसंस्कृती जिवंत राहिली तरच विचारांची समृद्धी आणि समाजाची प्रगती होईल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ग्रंथालय विभागप्रमुख डॉ. बी. जी. मुख्यदल यांनी केले, तर आभार प्रा. एल. एम. वळवी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. एस. बी. धनले, प्रा. एस. डी. महाजन, प्रा. टी. एम. दसनूरकर, सुनील मेढे आणि जयेश बढे यांनी सहकार्य केले.

# घाटकोपरमध्ये दरड कोसळली; सहा जणांचा मृत्यू

## चौघे जखमी मुसळधार पावसाचा फटका; चाळीतील घरांवर डोंगराचा भाग कोसळला

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । प्रतिनिधी:** मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर घाटकोपर पश्चिमेकडील चिरागनगर परिसरात बुधवारी पहाटे दरड कोसळून मोठी दुर्घटना घडली. दरड आणि मातीचा मोठा भाग चाळीतील घरांवर कोसळल्याने सहा जणांचा मृत्यू झाला असून चौघे जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.



घरांवर कोसळला डोंगराचा भाग चिरागनगर परिसरातील गौसिया चाळ भागात पहाटेच्या सुमारास डोंगरावरील माती व मलबा अचानक खाली आला. त्याखाली दोन ते तीन घरांचे नुकसान झाल्याचे वृत्त आहे. काही नागरिक ढिगाऱ्याखाली अडकल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती. बचाव पथके घटनास्थळी दाखल घटनेची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दल, महापालिकेची आपत्कालीन यंत्रणा आणि इतर बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. ढिगारा हटवून अडकलेल्या नागरिकांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. सततच्या पावसामुळे बचावकार्यात अडथळे निर्माण होत असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, या दुर्घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

# सुभाषचंद्र बोस यांचे प्रपौत्र चंद्र कुमार बोस यांच्याकडून 'आजाद हिंद पार्टी'ची घोषणा

## नवा राजकीय पर्याय उभारण्याचा मानस

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे प्रपौत्र चंद्र कुमार बोस यांनी नव्या राजकीय पक्षाची घोषणा केली आहे. 'आजाद हिंद पार्टी' या नावाने राजकीय संघटना उभारण्याची तयारी त्यांनी जाहीर केली असून, दिल्लीतील जंतर-मंतरवरील अलीकडील Gen-Z आंदोलनातून प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले.
युवकांच्या प्रश्नांना प्राधान्य आजची तरुण पिढी भ्रष्टाचार, शिक्षण, आरोग्य आणि प्रशासनातील समस्यांमुळे अस्वस्थ आहे. युवकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करून त्यांना नवा पर्याय देण्याच्या उद्देशाने 'आजाद हिंद पार्टी' उभारण्याचा मानस असल्याचे चंद्र कुमार बोस यांनी स्पष्ट केले आहे. प्रस्तावित पक्षाच्या माध्यमातून नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या समावेशक आणि धर्मनिरपेक्ष विचारांना पुढे नेण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे वृत्त आहे. TMC सोडल्यानंतर नवी राजकीय वाटचाल चंद्र कुमार बोस यांनी यापूर्वी तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. मात्र, काही काळातच त्यांनी TMC सोडण्याचा निर्णय घेतला. त्यापूर्वी ते भाजपमध्येही कार्यरत होते. आता दोन्ही प्रमुख पक्षांपासून दूर जात स्वतंत्र राजकीय व्यासपीठ उभारण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. नेताजींच्या विचारांचा नवा राजकीय पर्याय देशातील तरुणांना एका व्यासपीठावर आणून त्यांच्यामध्ये



राजकीय जागरूकता निर्माण करण्याचा आणि नेताजींच्या विचारांवर आधारित नवा राजकीय पर्याय उभा करण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे. त्यामुळे चंद्र कुमार बोस यांच्या नव्या राजकीय प्रयोगाकडे आगामी काळात विशेष लक्ष लागले आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे प्रपौत्र चंद्र कुमार बोस यांनी नव्या राजकीय पक्षाची घोषणा केली आहे. 'आजाद हिंद पार्टी' या नावाने राजकीय संघटना उभारण्याची तयारी त्यांनी जाहीर केली असून, दिल्लीतील जंतर-मंतरवरील अलीकडील Gen-Z आंदोलनातून प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले.
युवकांच्या प्रश्नांना प्राधान्य आजची तरुण पिढी भ्रष्टाचार, शिक्षण, आरोग्य आणि प्रशासनातील समस्यांमुळे अस्वस्थ आहे. युवकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करून त्यांना नवा पर्याय देण्याच्या उद्देशाने 'आजाद हिंद पार्टी' उभारण्याचा मानस असल्याचे चंद्र कुमार बोस यांनी स्पष्ट केले आहे. प्रस्तावित पक्षाच्या माध्यमातून नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या समावेशक आणि धर्मनिरपेक्ष विचारांना पुढे नेण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे वृत्त आहे.

# फळ-भाजी विक्रेत्यांच्या न्याय मागण्यांसाठी बहुजन मुक्ती पार्टीचे निदर्शने

## पथविक्रेता कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी; ३१ ऑगस्टला राज्यभर धरणे

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** पथविक्रेते, फेरीवाले तसेच फळ-भाजी विक्रेत्यांच्या विविध मागण्यांसाठी बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने बुधवारी (दि. १२ ऑगस्ट) जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. पथविक्रेत्यांवर होणारी कथित कारवाई थांबवून त्यांना कायद्यानुसार सन्मानजनक उपजीविकेचा अधिकार मिळावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. रस्त्याच्या कडेला भाजीपाला, फळे व अन्य वस्तूंची विक्री करून अनेक पथविक्रेते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मात्र, अतिक्रमण विभाग आणि प्रशासनाकडून वारंवार कारवाई करून मालाची नासधूस केली जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. त्यामुळे पथविक्रेत्यांसमोरील आर्थिक संकट अधिक गंभीर झाले असल्याचे त्यांनी सांगितले. पथविक्रेता कायद्याची अंमलबजावणी करण्याची मागणी पथविक्रेता अधिनियम २०१४ आणि महाराष्ट्र पथविक्रेता नियम २०१६ ची राज्यभर प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण करून त्यांना अधिकृत प्रमाणपत्र देण्यात यावे तसेच त्यांच्या व्यवसायाच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करावे,



अशीही मागणी आंदोलकांनी केली. बदलापूर येथील विशाल दाते या २८ वर्षीय तरुणाच्या आत्महत्येचा संदर्भ देत, पथविक्रेत्यांवरील कथित प्रशासकीय कारवाईच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची मागणी करण्यात आली. या प्रकरणात संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. आंदोलकांच्या प्रमुख मागण्या विशाल दाते यांच्या आत्महत्येस कारणीभूत असल्याचा आरोप असलेल्या संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधींवर गुन्हा दाखल करावा. दाते यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देऊन एका सदस्याला शासकीय नोकरी द्यावी. पथविक्रेता अधिनियम २०१४ व महाराष्ट्र नियम २०१६ ची राज्यभर प्रभावी अंमलबजावणी करावी.
सर्व पथविक्रेत्यांचे तातडीने सर्वेक्षण करून त्यांना व्यवसायाचे अधिकृत प्रमाणपत्र द्यावे. पथविक्रेत्यांच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करून त्यांच्या सन्मानजनक उपजीविकेच्या हक्काचे रक्षण करावे. निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन आंदोलनाचे नेतृत्व बहुजन मुक्ती पार्टीचे जळगाव जिल्हा युवा अध्यक्ष सुनील देहडे आणि जिल्हा सचिव खुशाल सोनवणे यांनी केले. आंदोलकांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी चव्हाण यांना तालुकाध्यक्ष श्रुषी भारसके व शहराध्यक्ष रवींद्र मोरे यांनी दिले. यावेळी बहुजन मुक्ती पार्टीचे राज्य प्रभारी सुमित्र अहिरे, सावरकर रिक्षा युनियनचे जिल्हाध्यक्ष दिलीप सपकाळे, भारत मुक्ती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष देवानंद निकम, पथविक्रेत्यांचे कायदेशीर सल्लागार ॲड. आनंद कोचुरे, पथविक्रेता प्रमुख विनोद निकम यांच्यासह विविध पदाधिकारी व पथविक्रेते उपस्थित होते. ३१ ऑगस्टला राज्यभर धरणे आंदोलनाचा इशारा पथविक्रेत्यांच्या मागण्यांवर योग्य कार्यवाही न झाल्यास ३१ ऑगस्ट रोजी राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. त्यानंतरही प्रश्न मार्गी न लागल्यास मंत्रालयावर लाखो पथविक्रेत्यांचा विशाल महामोर्चा काढण्यात येईल, असा इशारा बहुजन मुक्ती पार्टीचे महाराष्ट्र राज्य प्रभारी सुमित्र अहिरे यांनी दिला.

# 825 ग्रामपंचायतींवर प्रशासक; ग्रामविकासाची कामे ठप्प

## नव्या निविदांना आणि जुन्या कामांच्या बिलांना निर्बंध; स्वच्छतेपुरतेच प्रशासकांचे अधिकार

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील ८०० हून अधिक ग्रामपंचायतींची मुदत संपल्यानंतर तेथे प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, प्रशासकांच्या अधिकारांवर शासनाने घातलेल्या मर्यादांमुळे ग्रामीण भागातील विकासकामांना मोठा फटका बसत आहे. लोकनियुक्त पदाधिकारी नसल्याने स्थानिक प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याची यंत्रणाही मर्यादित झाली आहे. जिल्ह्यात तब्बल ८२५ ग्रामपंचायतींवर प्रशासकांची राजवट असल्याने ग्रामविकासाचा वेग मंदावल्याचे चित्र आहे. विकासकामांच्या निविदांना ब्रेक प्रशासकीय राजवटीचा सर्वाधिक परिणाम ग्रामपंचायतींच्या आर्थिक व्यवहारांवर झाला आहे. नव्या विकासकामांच्या निविदा काढण्यावर निर्बंध असून, यापूर्वी पूर्ण झालेल्या किंवा सुरू असलेल्या कामांची बिले अदा करण्यावरही मर्यादा आहेत. परिणामी रस्ते दुरुस्ती, गटारी, दिवाबत्ती तसेच इतर मूलभूत सुविधांशी संबंधित अनेक कामे रखडल्याचे चित्र आहे. पाणी, वीज अन् स्वच्छतेपुरते अधिकार शासनाच्या निर्देशांनुसार प्रशासकांना प्रामुख्याने अत्यावश्यक सेवांशी संबंधित खर्च करण्याची मुभा आहे. गावातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे, वीजबिले भरणे आणि स्वच्छता या बाबींवरच त्यांचे अधिकार मोठ्या प्रमाणात केंद्रित झाले आहेत. विकासात्मक किंवा धोरणात्मक स्वरूपाचे निर्णय घेण्यावर मर्यादा असल्याने गावांच्या गरजेनुसार नवीन कामे मार्गी लावणे कठीण होत आहे. पावसाळ्यात ग्रामस्थांची गैरसोय पावसाळ्यात ग्रामीण भागातील समस्या अधिक तीव्र झाल्या आहेत. अनेक ठिकाणी चिखलमय रस्ते, तुंबलेल्या किंवा तुटलेल्या गटारी तसेच पिण्याच्या पाण्याच्या समस्यांमुळे नागरिक त्रस्त आहेत. दुरुस्ती आणि स्वच्छतेसाठी आवश्यक निर्णय तसेच निधीच्या मर्यादांमुळे परिस्थिती हाताळताना प्रशासनास अडचणी येत आहेत. त्यामुळे काही भागांत रोगराईचा




धोका वाढण्याची भीतीही व्यक्त होत आहे. निवडणुका दिवाळीनंतर होणार? जिल्ह्यातील ग्रामपंचायतींसाठी सरपंच व सदस्य आरक्षणाची प्रक्रिया पूर्ण झाली असून, त्यावरील हरकती व आक्षेपांची प्रक्रियाही पार पडली आहे. मतदारयादीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता; मात्र हा कार्यक्रम सध्या स्थगित करण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींच्या निवडणुका नेमक्या कधी होणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. निवडणुकांचा कार्यक्रम दिवाळीनंतर जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. लोकप्रतिनिधींच्या अनुपस्थितीचा परिणाम ग्रामपंचायतींमध्ये लोकनियुक्त पदाधिकारी नसल्याने गावातील विकासकामांबाबत नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी स्थानिक पातळीवर पुढाकार घेणारी व्यवस्था मर्यादित झाली आहे. परिणामी अनेक प्रश्न प्रलंबित राहत असल्याची तक्रार ग्रामस्थांकडून होत आहे. ग्रामपंचायतींच्या निवडणुका लवकरात लवकर घेऊन गावांचा कारभार पुन्हा लोकप्रतिनिधींच्या हाती सोपवावा, अशी मागणी ग्रामीण भागातून जोर धरत आहे.

जळगाव जिल्ह्यातील ८०० हून अधिक ग्रामपंचायतींची मुदत संपल्यानंतर तेथे प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, प्रशासकांच्या अधिकारांवर शासनाने घातलेल्या मर्यादांमुळे ग्रामीण भागातील विकासकामांना मोठा फटका बसत आहे. लोकनियुक्त पदाधिकारी नसल्याने स्थानिक प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याची यंत्रणाही मर्यादित झाली आहे. जिल्ह्यात तब्बल ८२५ ग्रामपंचायतींवर प्रशासकांची राजवट असल्याने ग्रामविकासाचा वेग मंदावल्याचे चित्र आहे. विकासकामांच्या निविदांना ब्रेक प्रशासकीय राजवटीचा सर्वाधिक परिणाम ग्रामपंचायतींच्या आर्थिक व्यवहारांवर झाला आहे. नव्या विकासकामांच्या निविदा काढण्यावर निर्बंध असून, यापूर्वी पूर्ण झालेल्या किंवा सुरू असलेल्या कामांची बिले अदा करण्यावरही मर्यादा आहेत. परिणामी रस्ते दुरुस्ती, गटारी, दिवाबत्ती तसेच इतर मूलभूत सुविधांशी संबंधित अनेक कामे रखडल्याचे चित्र आहे. पाणी, वीज अन् स्वच्छतेपुरते अधिकार शासनाच्या निर्देशांनुसार प्रशासकांना प्रामुख्याने अत्यावश्यक सेवांशी संबंधित खर्च करण्याची मुभा आहे. गावातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे, वीजबिले भरणे आणि स्वच्छता या बाबींवरच त्यांचे अधिकार मोठ्या प्रमाणात केंद्रित झाले आहेत. विकासात्मक किंवा धोरणात्मक स्वरूपाचे निर्णय घेण्यावर मर्यादा असल्याने गावांच्या गरजेनुसार नवीन कामे मार्गी लावणे कठीण होत आहे. पावसाळ्यात ग्रामस्थांची गैरसोय पावसाळ्यात ग्रामीण भागातील समस्या अधिक तीव्र झाल्या आहेत. अनेक ठिकाणी चिखलमय रस्ते, तुंबलेल्या किंवा तुटलेल्या गटारी तसेच पिण्याच्या पाण्याच्या समस्यांमुळे नागरिक त्रस्त आहेत.

# मायक्रोफोनऐवजी पाण्याची बाटली अन् खड्ड्यांवर 'ग्राऊंडरिपोर्टिंग'!

## चिमुकल्यांचा प्रशासनाला अनोखा आरसा

जन सम्राट टाईम्स

**नाशिक । प्रतिनिधी:** नागरिक त्रस्त असताना आता प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शाळकरी मुलांनीच अनोखी पत्रकारिता सुरू केली आहे. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील पेगलवाडी-गोहिरेवाडी परिसरातील विद्यार्थ्यांनी पाण्याच्या रिकाम्या बाटलीला मायक्रोफोन बनवत रस्त्यांवरील खड्ड्यांचे 'ग्राऊंड रिपोर्टिंग' केले. या चिमुकल्यांचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. 'रस्त्यावर खड्डे की खड्ड्यात रस्ता?' पेगलवाडी परिसरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली असून, रस्त्यावर खड्डे आहेत की खड्ड्यांमध्ये रस्ता आहे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने शाळकरी विद्यार्थी आणि ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शाळेत जाताना खराब रस्त्यामुळे होणाऱ्या त्रासाची व्यथा विद्यार्थ्यांनी आपल्या अनोख्या 'रिपोर्टिंग'मधून मांडली. रिकामी पाण्याची बाटली हातात घेऊन त्यांनी रस्त्यावरील खड्डे दाखवत प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या विद्यार्थ्यांनी कोणत्याही व्यावसायिक साधनांशिवाय केलेल्या या 'ग्राऊंड रिपोर्टिंग'मधून परिसरातील रस्त्यांची वास्तविक परिस्थिती समोर आणली आहे. सामाजिक जाणीव आणि सर्जनशीलतेतून विद्यार्थ्यांनी प्रशासनाला जणू आरसाच दाखवला आहे. व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर ग्रामस्थांमध्येही संताप व्यक्त होत आहे. दखल घेऊन पेगलवाडी-गोहिरेवाडी परिसरातील रस्त्यांची तातडीने पाहणी करून खड्डे बुजवावेत आणि रस्त्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी जोर धरत आहे. चिमुकल्यांचा सवाल प्रशासनाला दररोज शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांनाच जर खराब रस्त्यांमुळे जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असेल, तर विकासाच्या दाव्यांचे काय? असा सवाल आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# जरंडी प्राथमिक आरोग्य केंद्रात जन आरोग्य समितीची सभा!

## औषधांचा पुरेसा साठा ठेवण्याच्या सूचना



जन सम्राट टाईम्स

**जरंडी | प्रतिनिधी :** जरंडी प्राथमिक आरोग्य केंद्रात जन आरोग्य समितीची सर्वसाधारण सभा जिल्हा परिषद सदस्या सौ. पुष्पाताई प्रकाश काळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्याबाबत विविध महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी सर्पदंश, रेबीज, टायफॉईड, न्यूमोनिया तसेच गरोदर माता आणि लहान बालकांसाठी आवश्यक असलेल्या औषधांचा पुरेसा साठा कायम उपलब्ध ठेवावा, अशा सूचना देण्यात आल्या. ग्रामीण भागातील नागरिकांना तातडीच्या उपचारांसाठी आवश्यक औषधे वेळेवर उपलब्ध व्हावीत, याबाबत विशेष दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले. आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी नियमितपणे आपली सेवा बजावावी.

रुग्णांना उपचारासाठी अनावश्यक त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी. सेवेत हलगर्जीपणा आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, अशा सूचना सभेत देण्यात आल्या. स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्षाचे लोकार्पण सभेच्या निमित्ताने स्तनदा मातांसाठी उभारण्यात आलेल्या हिरकणी कक्षाचे लोकार्पण करण्यात आले. या कक्षामुळे आरोग्य केंद्रात उपचारासाठी येणाऱ्या स्तनदा मातांना आवश्यक सुविधा उपलब्ध होणार असून, त्यांच्या सोयीच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. मान्यवरांची उपस्थिती सभेस सौ. जयश्री पवार (पंचायत समिती सदस्या), नंदाताई आगे (जिल्हा समिती सदस्य), सौ. स्वाती पाटील (सरपंच, जरंडी), सौ. वंदनाताई पाटील (माजी सरपंच), संजीवन सोनवणे (माजी पंचायत समिती सदस्य), राजेंद्र पाटील, दिलीप पाटील, भिवा चव्हाण, तसेच वैद्यकीय अधिकारी सचिन पवार, प्रयोगशाळा परिचर ज्ञानेश्वर पाटील, पर्यवेक्षक अनिता राठोड, अनिल जोहरे, संगीता वानखेडे, दादाराव झोंड यांच्यासह आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. सभेत प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्यसेवा, औषध उपलब्धता आणि नागरिकांना देण्यात येणाऱ्या सुविधांचा आढावा घेण्यात आला. जरंडी प्राथमिक आरोग्य केंद्रात जन आरोग्य समितीची सर्वसाधारण सभा जिल्हा परिषद सदस्या सौ. पुष्पाताई प्रकाश काळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्याबाबत विविध महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी सर्पदंश, रेबीज, टायफॉईड, न्यूमोनिया तसेच गरोदर माता आणि लहान बालकांसाठी आवश्यक असलेल्या औषधांचा पुरेसा साठा कायम उपलब्ध ठेवावा, अशा सूचना देण्यात आल्या.

# ग्रामपंचायत खडकेला राज्य शासनाचा 'आदिशक्ती पुरस्कार' जाहीर

## सामाजिक-शैक्षणिक विकास आणि आरोग्यविषयक उपक्रमांची दखल

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'आदिशक्ती अभियानात' उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल भुसावळ तालुक्यातील ग्रामपंचायत खडकेला राज्य शासनाचा मानाचा 'आदिशक्ती पुरस्कार' जाहीर झाला आहे. भुसावळ तालुक्यात प्रथमच हा पुरस्कार मिळाल्याने संपूर्ण तालुक्यात आनंदाचे वातावरण असून, ग्रामपंचायतीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. महिलांचे सक्षमीकरण, सामाजिक व शैक्षणिक विकास, आरोग्यविषयक उपक्रम तसेच विविध जनजागृतीपर कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये ग्रामपंचायत खडकेने उल्लेखनीय कामगिरी केली. या सर्वसमावेशक कार्याची दखल घेत राज्य शासनाने ग्रामपंचायतीची पुरस्कारासाठी निवड केली आहे. विशेष मार्गदर्शनामुळे यशाला गवसणी



या यशामध्ये भुसावळ पंचायत समितीचे गटविकास अधिकारी डॉ. कुलदीप ठाकूर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. आदिशक्ती अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी सरपंच तथा प्रशासक सौ. यशोधरा देविदास तायडे, उपसरपंच सौ. अर्चना झामसिंग पाटील, ग्रामपंचायत अधिकारी सौ. कांचन पंडितराव बादशाह, प्रकल्प/भुसावळ तालुका समन्वयक सुनिल जगन हिवाळे व सौ. दिपाली सुनिल हिवाळे यांनी विशेष योगदान दिले. तसेच ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि कर्मचारीवर्गाच्या सहकार्यामुळे अभियानाची प्रभावी अंमलबजावणी शक्य झाली. विविध संस्थांकडून अभिनंदन ग्रामपंचायत खडकेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आधार बहुउद्देशीय संस्था, अमळनेरच्या अध्यक्षा डॉ. भारती पाटील आणि सहसंचालक रेणू प्रसाद यांच्या वतीने ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. राज्य शासनाचा 'आदिशक्ती पुरस्कार' मिळाल्याने खडके ग्रामपंचायतीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून भुसावळ तालुक्याच्या गौरवातही भर पडली आहे. ग्रामपंचायतीच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# NEET विद्यार्थ्यांच्या नावाने 'मगरीचे अश्रू', रिसॉर्टवर आधीच जंगी पार्टी?

## चौधरींच्या भूमिकेवर सवाल वाढदिवस साजरा न करण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स


**मुंबई | प्रतिनिधी:** NEET परीक्षेतील कथित गैरप्रकार आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर वाढदिवस साजरा न करण्याचे आवाहन करणारे शिवसेना नेते अजय चौधरी यांची भूमिका आता वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. चौधरी यांनी सोशल मीडिया व्हिडिओद्वारे यंदा वाढदिवस साजरा न करण्याचे आवाहन केले असताना, त्यांच्या ७२व्या वाढदिवसानिमित्त १ आणि २ ऑगस्ट रोजी उरण येथील 'सिल्व्हर ओक रिसॉर्ट'मध्ये खास निमंत्रितांसाठी सेलिब्रेशन आयोजित करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. यासंदर्भातील निमंत्रणपत्रिका आणि कार्यक्रमाचे वेळापत्रक समोर आल्याचा दावा होत असून, त्यामुळे चौधरी यांच्या कथनी आणि करणीमध्ये विसंगती असल्याचे आरोप विरोधकांकडून अथवा टीकाकारांकडून केले जात आहेत. व्हिडिओत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचा उल्लेख अजय चौधरी यांनी नुकत्याच प्रसारित केलेल्या व्हिडिओमध्ये आपला वाढदिवस १२ ऑगस्ट रोजी येत असल्याचे सांगत, NEET परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर यंदा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतल्याचे म्हटले आहे. विद्यार्थ्यांप्रती संवेदना व्यक्त करत कार्यकर्त्यांनीही वाढदिवसाचे आयोजन करू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे. तसेच १२ ऑगस्ट रोजी आपण मुंबईबाहेर असल्याचेही त्यांनी व्हिडिओमध्ये सांगितल्याचे नमूद करण्यात आले आहे. १-२ ऑगस्टच्या कार्यक्रमामुळे प्रश्नचिन्ह दरम्यान, समोर आल्याचे सांगितले जात असलेल्या निमंत्रणपत्रिकेनुसार, चौधरी यांच्या वाढदिवसानिमित्त १ व २ ऑगस्ट रोजी उरण येथील सिल्व्हर ओक रिसॉर्टमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या कथित वेळापत्रकात १ ऑगस्ट रोजी स्वागत, रूम चेक-इन, भोजन, हाय टी, पूल टाईम तसेच सायंकाळपासून रात्रीपर्यंत मनोरंजन, संगीत, केक कटिंग आणि डिनरचा समावेश असल्याचे दिसून येते. २ ऑगस्ट रोजी नाश्त्यानंतर पाहुण्यांचे चेक-आउट नियोजित असल्याचेही नमूद आहे. यामुळे 'वाढदिवस साजरा करणार नाही' असे आवाहन करण्यापूर्वीच वाढदिवसाचे सेलिब्रेशन झाले होते का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. भूमिकेवर स्पष्टीकरणाची मागणी एका बाजूला विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर संवेदनशील भूमिका मांडायची आणि दुसऱ्या बाजूला वाढदिवसाचे कथित सेलिब्रेशन आधीच आयोजित करायचे, ही विसंगती असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणावर अजय चौधरी यांनी स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी होत आहे. विशेषतः १-२ ऑगस्ट रोजी नेमका कोणता कार्यक्रम झाला, तो वाढदिवसाशी संबंधित होता का आणि त्याचे स्वरूप काय होते, याबाबत चौधरी किंवा त्यांच्या कार्यालयाकडून अधिकृत स्पष्टीकरण येणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान, या आरोपांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी किंवा अजय चौधरी यांची याबाबतची बाजू उपलब्ध नसल्याने, निमंत्रणपत्रिका व कार्यक्रमाचे वेळापत्रक यांची सत्यता आणि त्यांचा संदर्भ तपासणे आवश्यक आहे.

# विभागीय आयुक्त कार्यालयासमोर पोलिसांची व्हॅन 'बेवारस'! प्रशासनाचे वाहनच रामभरोसे?

## गेल्या ४–५ दिवसांपासून पोलिसांची शासकीय व्हॅन कार्यालयासमोर; दरवाजे-खिडक्या लॉक नसल्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स

**छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी:** छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर पोलिसांची शासकीय व्हॅन गेल्या ४–५ दिवसांपासून उभी असल्याचे दिसून येत आहे. पोलिसांचे शासकीय वाहन खराब झाल्यानंतर ते दुरुस्तीसाठी न नेता तसेच उभे करण्यात आल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे या व्हॅनचे दरवाजे व खिडक्या लॉक नसल्याचे सांगण्यात येत असल्याने शासकीय वाहनाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिसांच्या ताफ्यातील वाहनाचीच अशा प्रकारे सुरक्षा होत असेल, तर इतर शासकीय मालमत्तेच्या सुरक्षेबाबत काय परिस्थिती असेल, असा सवाल नागरिकांकडून



उपस्थित केला जात आहे. शासकीय वाहनाची जबाबदारी कोणाची? शासकीय वाहन खराब झाल्यानंतर त्याची दुरुस्ती, देखभाल आणि सुरक्षित पार्किंगची जबाबदारी संबंधित विभागाची असते. मात्र, वाहन अनेक दिवस कार्यालयासमोर उभे असून त्याचे दरवाजे-खिडक्या लॉक नसल्याचा प्रकार समोर आल्याने संबंधित यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वाहनात कोणालाही प्रवेश करता येण्याची शक्यता असल्यास त्याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. या प्रकाराची संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन वाहन सुरक्षित ठिकाणी हलवावे तसेच त्याच्या सुरक्षेबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे. पोलिसांच्या वाहनाचीच सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे चित्र निर्माण झाले असून, प्रशासन याची दखल कधी घेणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# 'शिक्षणाचे स्वप्न उराशी बाळगा, आयुष्यात मोठे व्हा' : जलसंपदामंत्री

## प्रज्ञावंत फाउंडेशनच्या शैक्षणिक साहित्य वाटप उपक्रमाचे कौतुक; 'ज्ञानदीप' अभियानाचा शुभारंभ

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** "आई-वडील आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी अहोरात्र कष्ट करतात. त्यांच्या कष्टांची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी मनापासून अभ्यास करावा, शिक्षणाचे स्वप्न उराशी बाळगावे आणि आयुष्यात मोठे यश संपादन करावे," असा प्रेरणादायी संदेश जलसंपदामंत्री ना. गिरीष महाजन यांनी विद्यार्थ्यांना दिला. आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई आणि प्रज्ञावंत फाउंडेशन, जळगाव यांच्या वतीने राबविण्यात आलेला शैक्षणिक साहित्य वाटप उपक्रम आणि 'ज्ञानदीप' अभियान



कौतुकास्पद व समाजाला दिशा देणारे असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले. जळगाव येथील नियोजन भवनात सोमवारी (दि. १० ऑगस्ट) आयोजित शैक्षणिक साहित्य वाटप सोहळ्यात ते बोलत होते. 'गरजू विद्यार्थ्यांसाठी मदतीचा हात देणे हे समाजाभिमुख कार्य' जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. "समाजातील गरजूंची नेमकी गरज ओळखून त्यांना मदतीचा हात देणे, हे खऱ्या अर्थाने समाजाभिमुख कार्य आहे. पत्रकार संघ आणि प्रज्ञावंत फाउंडेशन गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत आहेत, ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे," असे त्यांनी सांगितले. शैक्षणिक साहित्याचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांनी मनापासून अभ्यास करून मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहनही जिल्हाधिकारी घुगे यांनी केले. 'ज्ञानदीप' अभियानाचा शुभारंभ प्रज्ञावंत फाउंडेशन, जळगावच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या 'ज्ञानदीप' अभियानाच्या पोस्टरचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. जिल्ह्यातील गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन हे अभियान वर्षभर राबविण्याचा संकल्प महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य कार्याध्यक्ष तथा प्रज्ञावंत फाउंडेशनचे संचालक प्रवीण सपकाळे यांनी व्यक्त केला. "शैक्षणिक साहित्याची मदत... प्रत्येक गरजू विद्यार्थ्याच्या जीवनात 'ज्ञानाचा दीप' प्रज्वलित करण्याचा संकल्प," या उद्देशाने सुरू करण्यात आलेले 'ज्ञानदीप' अभियान विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आधार देण्यासोबतच समाजातील दातृत्वाची भावना अधिक बळकट करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ३०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमास जलसंपदामंत्री गिरीष महाजन, जिल्हाधिकारी रोहन घुगे, महानगरपालिका आयुक्त आदित्य जीवणे, पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर, महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज काळे, जिल्हा प्रदूषण अधिकारी करण राजपूत यांच्यासह श्री राष्ट्रीय राजपूत करणी सेनेचे प्रदेशाध्यक्ष प्रवीणसिंह पाटील, ज्येष्ठ पत्रकार विजय पाठक, ज्येष्ठ महिला संपादक शांता वाणी, संपादक मुकुंद नन्नावरे, करणी सेनेचे राज्य संघटक विलास पाटील, संघटनेचे विधी सल्लागार ॲड. दीपक सपकाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# भूसंपादनाचा मोबदला उशिरा मिळाल्यास व्याजात सुधारणा!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई। प्रतिनिधी:** राज्य शासनाच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंगळवारी (दि. ११ ऑगस्ट २०२६) महसूल विभागाशी संबंधित महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. भूसंपादनाचा मोबदला मिळण्यास विलंब झाल्यास देण्यात येणाऱ्या व्याजदरात सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली असून, दुसरीकडे नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी जमीन हस्तांतरणाशी संबंधित शुल्कात मोठ्या सवलती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भूसंपादनाचा मोबदला उशिरा मिळाल्यास वाढीव व्याज भूसंपादन प्रक्रियेत जमीन संपादित झाल्यानंतर मोबदला मिळण्यास विलंब झाल्याने शेतकरी व जमीनमालकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते. ही बाब लक्षात घेऊन शासनाने 'भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३'च्या कलम ७२ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. या सुधारणेमुळे भूसंपादनाचा मोबदला देण्यास विलंब झाल्यास संबंधितांना देण्यात येणाऱ्या व्याजदरात सुधारणा होणार आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकरी आणि जमीनमालकांना अधिक न्याय्य आर्थिक भरपाई मिळण्यास मदत होणार आहे. नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना मुद्रांक शुल्कात मोठी सवलत राज्यात सौर, पवन तसेच अन्य नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना चालना देण्यासाठी महसूल विभागाने दोन महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.